पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
मा. फ प्रभाग समिती
कार्यपत्रिका क्रमांक -०९

# सभावृत्तांत

दिनांक :- ०२/०१/२०२० वेळ :- स.११.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. फ प्रभाग समितीची मासिक सभा गुरुवार दिनांक ०२/०१/२०२० रोजी स. ११.३० वा.फ प्रभाग कार्यालयाचे "राजर्षी शाहू महाराज" सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सभापती |
| २. | मा.कुंदन अंबादास गायकवाड | सदस्य |
| ३. | मा.साधना अंकुश मळेकर | सदस्य |
| ४. | मा.अश्विनी भिमा बोबडे | सदस्या |
| ५. | मा.संजय बबन नेवाळे | सदस्य |
| ६. | मा. भालेकर प्रविण महादेव | सदस्य |
| ७. | मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे | सदस्य |
| ८. | मा. संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्य |
| ९. | मा.पंकज दत्तात्रय भालेकर | सदस्य |
| १०. | मा.घोलप कमल अनिल | सदस्य |
| ११. | मा. दिनेश लालचंद यादव | नामनिर्देशित सदस्य |
| १२. | मा.संतोष भाऊसाहेब मोरे | नामनिर्देशित सदस्य |

याशिवाय खालील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. वामन नेमाणे प्रशासन अधिकारी, मा.श्रीकांत सवणे-कार्यकारी अभियंता(स्थापत्य),मा.प्रवीण लडकत-कार्यकारी अभियंता(पाणी पुरवठा), प्रवीण धोडे-कार्यकारी अभियंता(विद्युत), मा. मोहन निकम-लेखाधिकारी, मा. हनुमंत शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), मा. शहाजी गायकवाड-उपअभियंता (पा.पु.),मा. किशोर महाजन-उपअभियंता(जलनि:स्सारण),मा.जाधव व्ही.के.-उपअभियंता (स्थापत्य उद्यान),मा.अ.अ.पाठक-उपअभियंता(बीएसयूपी-स्थापत्य),मा.खोंद्रे मोहन ईश्वरा-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य) , मा.डी.जे.शिर्के-सहाय्यक आरोग्याधिकारी, श्री कोंढरे एस.आर.-कार्यालय अधिक्षक(अतिक्रमण),~~श्री पी.बी.वाघमोडे-अतिक्रमण अधिक्षक~~,श्री चव्हाण अे.अे.कनिष्ठ अभियंता(जलनि:स्सारण),श्री गुरु शेखर चंद्रकांत-क.अभियंता(नगररचना), श्री सतिश लांडगे-अतिक्रमण निरिक्षक, श्री कोटीयाना डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्यकिय विभाग), श्री गोसावी जी.आर. - सहा.उद्यान अधिक्षक, श्री डी.जी.कांबळे-उद्यान सहाय्यक.

मा.सभापती मा. योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाज सुरु करणेस अनुमती दिली.

Scanned with CamScanner

मा.सभापती व उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने सभेत खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१ मा.स्विनल कपिल म्हेत्रे, सदस्या यांचा दिनांक २/१/२०२० रोजीचा प्रस्ताव.

फ प्रभाग क्र.१ चिखली येथील साने कॉलनी रस्ता ते शिवकृपा कॉलनी रस्ता नाल्यापर्यंत स्टॉर्म वॉटर लाईनसाठी डांबरी रस्ता खोदाईस मान्यतेबाबत.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

दि. 05/12/2019 रोजी स.11.30 वा. झालेल्या मासिक सभेचा सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्रमांक 08) कायम करणेत येत असल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

विषय क्र - 1 ठराव क्र. - 11

दिनांक - 02/01/2020 विभाग - फ क्षेत्रिय प्रशासन विभाग

सुचक- मा.योगिता नागरगोजे अनुमोदक- मा.प्रविण भालेकर

संदर्भ-१.मा.क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील पत्र क्र.फक्षेका/प्रशा/१/कावि/१२५/२०१९ दि.१/२/२०१९.

२.मा.फ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ५ दिनांक ४/७/२०१९

फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. 11 मधील विविध प्रकल्पांचे नामकरणाबाबत मा. फ प्रभाग समिती ठराव क्र. 19 दि. 04/12/2018 अन्वये सन्मा. प्रभाग समिती सदस्यांमार्फत ठेवलेला विषय सर्वानुमते मान्य करणेत आलेला असुन सदर ठरावान्वये घरकुल प्रकल्प कमान (प्रवेशद्वार) १) लोकनेते गोपीनाथ मुंढे नगर २) समस्त नेवाळे मळा प्रवेशद्वार असे नामकरण करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

फेडरेशन ऑफ घरकुल सहकारी गृहरचना संस्था मर्या. चिखली, भारिप बहुजन महासंघ व संविधान दिन सोहळा समिती यांनी दि. 01/01/2019 चे पत्रानुसार घरकुल प्रकल्प कमानीचे नामकरणास विरोध दर्शविला आहे.

दिनांक 23/01/2019 रोजी आपले सरकार वेबपोर्टलवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने केलेला ठराव दुरुस्त करुन घरकुलचे नामकरण हे प्रचलित नावाप्रमाणेच घरकुल नवनगर संकुल करण्यात यावे अशी तक्रार दाखल केली आहे.

तसेच भगवानबाबा प्रतिष्ठाण मोरवाडी, जयभगवान महासंघ - पिंपरी चिंचवड परिवर्तन पार्टी पिंपळे गुरव या यांनी दि. 16/01/2019 व 21/1/2019 चे पत्रान्वये घरकुल प्रकल्पाचे "स्व. गोपीनाथ मुंढे नगर" नामकरण करणेबाबत समर्थन केलेले आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे काही संस्थांनी विरोध दर्शविला असून काही सस्थांनी सहमती दर्शविलेली आहे. तरी सदरचा घरकुल नामकरणाबाबतचा विषय नजीकच्या मा. प्रभाग समिती सभेमध्ये अवलोकनार्थ सादर करणेत यावा.

सदर विषयाबाबत सांगोपांग चर्चा झाली असता सदरचा विषय माहे फेब्रुवारी २०२० चे फ प्रभाग समितीचे मासिक सभेपर्यंत तहकूब करणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

सदर विषय सर्वानुमते तहकूब करणेत आला.

---

Scanned with CamScanner

यानंतर खालीलप्रमाणे ऐनवेळेसचे विषय चर्चेसाठी घेणेत आले.

विषय क्र - 2 ठराव क्र. - 12

दिनांक - 02/01/2020 विभाग – सदस्य प्रस्ताव

सुचक- मा.सौ.कमल घोलप अनुमोदक- मा.साधना मळेकर

संदर्भ-१.मा.स्विनल म्हेत्रे, सदस्य यांचा दिनांक २/१/२०२० रोजीचा अर्ज.

प्रभाग क्रमांक १ चिखली येथील साने कॉलनी ते शिवकृपा कॉलनी रोड नाल्यापर्यंतचा रस्त्यावर स्टॉर्म वॉटर लाईन टाकून अंगणवाडी रोडपासून साने कॉलनी पर्यंत साठणारे पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी सदरचे काम करणे अत्यंत आवश्यक असल्याने शिवकृपा कॉलनी रस्त्याचे डांबरीकरण चालू वर्षात उन्हाळयापूर्वी झालेले असल्याने व पावसाळ्यात अनेक ठिकाणी पावसाचे पाणी वेगवेगळया सोसायटीमधील अनेक नागरिकांच्या घरात घुसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला होता. त्यामुळे त्यांनी स्थानिक प्रभाग क्र.१ मधील सर्व नगरसदस्यांकडे याबाबत तक्रारी करण्यात आल्या होत्या.त्यामुळे सद्यस्थितीत पावसाच्या पाण्याचा निचरा होणे आवश्यक असल्याने सदरचा रस्ता खोदाईस मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा. सभापती यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

(योगिता नागरगोजे)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय,निगडी ४४
क्र.फक्षेका/सभा/कावि/ ०१ /२०२० दिनांक /०१/२०२०.

प्रशासन अधिकारी
तथा
सचिव (सभाशाखा)
फ प्रभाग समिती
निगडी.

प्रत -- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Scanned with CamScanner